# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
## Maharashtra Prathamik Shikshan Parishad
(Govt. of Maharashtra Undertaking)

जा. क्र. मप्राशिप/सशिअ/नाउ-संशि-राआअ/२०१७-१८/ 9360     दिनांक : 21 JUN 2017

विषय: सन २०१७-१८ मध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम-संगणक शिक्षण व राष्ट्रीय आंविष्कार अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.

राष्ट्रीय व राज्य अध्यापन संपादणूक पातळी व राज्याची गणित व विज्ञानामधील राष्ट्रीय अध्ययन संपादणूक पातळी कमी आहे. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता गणित व विज्ञान विषयामध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारणे आवश्यक आहे. जेणेकरून विद्यार्थी पुढे जाऊन गणित व विज्ञान विषयात प्रगती करू शकतील. त्यांची जिज्ञासू वृत्ती वाढू शकेल. त्यातून मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होईल.

राज्य शासनाकडून गणित विषयामध्ये विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी गणिताचार्य भास्कराचार्य कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. मागील दोन वर्षापासून राज्यात सर्वत्र अपूर्व विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामधून मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन व आवड निर्माण होत आहे.

वर्गातील शैक्षणिक वातावरण उत्साही, मुलांना सतत क्रियाशील ठेवणारे असायला हवे. त्यांना विचार करण्यास चालना देणारे, त्यांची संशोधक वृत्ती जोपासणारे, नाविन्याची माहिती मिळविणारे व त्याचा वापर करण्यास प्रवृत्त करणारे कृतीस वाव मिळवून देण्यासाठी विविध संसाधने वर्गात उपलब्ध असावयास हवी. मुलांमधील चौकसपणा व सृजनशील कला गुणांना वाव मिळावा, विज्ञान व गणित विषयाची निर्माण व्हावी, ज्या मुलांचा विशेष कल व प्रतिभा या विषयाकडे आहे त्यांना आणखीन प्रोत्साहन देऊन तश्या प्रकारच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने भारत सरकारने दिनांक ९ जुलै, २०१५ रोजी भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते राष्ट्रीय आविष्कार अभियानाची सुरूवात केली आहे. या कार्यक्रमांतर्गत शाळांमध्ये नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र उभारणीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम-संगणक शिक्षण व राष्ट्रीय आविष्कार अभियानासाठी दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तात मंजूर करण्यात आलेली तरतूद पुनर्विनियोजित करून राज्य स्तरावर राखीव ठेवण्यात येत आहे. त्यामुळे आपल्या स्तरावरून

सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

याबाबत कोणत्याही स्वरूपात खर्च करण्यात येऊ नये. या लेखाशिर्षाखाली खर्च झाल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी. राज्यस्तरावर राखून ठेवण्यात आलेल्या निधीच्या विनियोगानंतर जे.व्ही. द्वारे खर्च सर्व जिल्हा परिषदांना या कार्यालयाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

अपूर्व विज्ञान मेळावा, वैज्ञानिक आविष्कार, विज्ञानात विशेष संशोधन व काही परिणात प्राप्त झालेल्या शैक्षणिक बाबींशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

(नंद कुमार भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प., मुंबई.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

प्रत : माहितीस्तव,

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
४) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
५) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
६) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).